दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा          कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : २९✻ जालना ✻ ✻ रविवार ३० ऑगस्ट २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

## महाराष्ट्रासह दिल्ली, कर्नाटकात 'स्वाईन फ्लू'च्या रुग्णांच्या संख्येत वाढ

नवी दिल्ली : देशातील अनेक राज्यांमध्ये स्वाइन फ्लूचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. दिल्ली, कर्नाटक, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि चंदीगडसह अनेक राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये एच१एन१ आणि इन्फ्लूएंझाचे रुग्ण वाढले आहेत. आरोग्य विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार, काही राज्यांमध्ये यंदा नोंदवलेल्या रुग्णांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत अधिक आहे. राष्ट्रीय् दिल्लीत स्वाइन फ्लूचा संसर्ग सातत्याने वाढत असून, २७ ऑगस्टपर्यंत एच१एन१चे २,७२९ रुग्ण आढळले आहेत. केवळ २७ ऑगस्ट रोजी १२५ नवीन रुग्णांची नोंद झाली. इन्फ्लूएंझा 'ए' आणि 'बी'चे रुग्ण धरून दिल्लीत




एकूण बाधितांची संख्या ३,७३६ झाली आहे. यातील सुमारे तीन-चतुर्थांश रुग्ण एच१एन१चे आहेत. कर्नाटकात एच१एन१ आणि इन्फ्लूएंझाच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे. २४ ऑगस्टपर्यंत राज्यात प्रयोगशाळेतून निदान झालेले ४,४२८ रुग्ण नोंदवले गेले आहेत. कर्नाटकात इन्फ्लूएंझाचा प्रादुर्भाव प्रामुख्याने वर्षातून दोनदा वाढतो. जानेवारी ते मार्च आणि जुलै ते सप्टेंबर या कालावधीत (पान ३ वर)

## जात पडताळणी समित्यांच्या अस्तित्वावरून विखे पाटील लक्ष्यावर

**ना. राधाकृष्ण विखेपाटील यांचा जात पडताळणी समित्या संदर्भातील सल्ला हा असंविधानिक व बेकायदेशीर असून ते सकल मराठा समाजाची परत परत फसवणूक करत असल्याचा डॉ. संजय लाखेपाटील यांचा गंभीर आरोप**

जालना/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्यातील जातपडताळणी समित्यांच्या वैधानिक अस्तित्वाच्या प्रश्नावरून मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी जोरदार टीका केली आहे. देशभर जातपडताळणी समित्या अस्तित्वात नसून त्या केवळ महाराष्ट्रातच असल्याने त्यांची आवश्यकता नाही आणि त्या बरखास्त कराव्यात, असा सल्ला विखे पाटील यांनी दिल्याचे समोर आल्याचा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला आहे. असा सल्ला देणे धक्कादायक, असंविधानिक आणि बेकायदेशीर असून, वैधानिक व कायदेशीर तरतुदींबाबतचे घोर अज्ञान यातून दिसून येते, असा आरोप त्यांनी केला. डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले की, जातपडताळणी समित्या किंवा जात छाननी समित्यांची



संकल्पना केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही. कुमारी माधुरी पाटील विरुद्ध अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास (Civil -ppeal No. 5854 of 1994) या ऐतिहासिक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जात व (पान ३ वर)

## जालना शहरातील चौधरी नगर येथे तीज महोत्सव उत्साहात साजरा; आमदार अर्जुनराव खोतकर व सौ. सीमाताई खोतकर यांची उपस्थिती

### बंजारा समाज भगिनींसोबत सौ. सीमाताई खोतकर यांनी धरला पारंपरिक नृत्याचा ठेका; महिला भगिनींच्या उत्साहाला मिळाली दाद

जालना : चौधरीनगर महाराष्ट्रातील तीज महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर आणि सौ. सीमाताई अर्जुनराव खोतकर✻✻ यांनी उपस्थित राहून महिला भगिनींना तीज महोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. पारंपरिक वेशभूषा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली. तीज महोत्सवानिमित्त बंजारा समाजातील महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह पारंपरिक नृत्य सादर केले. यावेळी सौ. सीमाताई अर्जुनराव खोतकर यांनी बंजारा समाजातील भगिनींसोबत उत्स्फूर्तपणे नृत्यात सहभाग घेतला आणि महिलांसोबत आनंदाने ठेका धरला. त्यांच्या या सहभागामुळे उपस्थित महिला भगिनींच्या उत्साहात आणखी भर पडली. सौ. सीमाताई खोतकर यांनी कोणताही औपचारिकपणा न ठेवता महिलांमध्ये मिसळून त्यांच्या आनंदात सहभागी होत पारंपरिक नृत्य केले. यावेळी उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या सहभागाचे स्वागत केले. बंजारा समाजाच्या पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या सोहळ्यातील हा क्षण उपस्थितांसाठी विशेष आकर्षणाचा ठरला. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित महिला भगिनींशी संवाद साधत तीज महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणण्याचे तसेच आपल्या समृद्ध संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले. महिला भगिनींचा सामाजिक, सांस्कृतिक आणि विविध क्षेत्रांतील सहभाग वाढावा, यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक



असल्याचेही त्यांनी नमूद केले. तीज महोत्सवाच्या माध्यमातून महिलांना एकत्र येत आपला आनंद व्यक्त करण्याची आणि पारंपरिक संस्कृतीचा उत्सव साजरा करण्याची संधी मिळाली. विशेषतः बंजारा समाजातील पारंपरिक नृत्य, वेशभूषा आणि सांस्कृतिक सादरीकरणामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. सौ. सीमाताई खोतकर यांनीही सर्व महिला भगिनींना तीज महोत्सवाच्या शुभेच्छा देत त्यांच्या आनंदात सहभागी झाल्या. महिलांसोबत केलेल्या उत्स्फूर्त नृत्यामुळे कार्यक्रमात आपुलकीचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमास महिला भगिनींसह विविध मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक संस्कृती, महिला एकजूट आणि उत्साहाच्या वातावरणात तीज महोत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना येथे विजय चव्हाण यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या उपोषणाला सर्व प्रथम उपस्थित राहुल उद्योग मंत्री उदय सामंत यांना उपोषण स्थळी नेऊन उपोषणकर्त्यांचे सविस्तर चर्चा घडवली व बंजारा समाज बांधवांच्या एस. टी. आरक्षण संदर्भात विधानसभेत आवाज उठवला या वेळी ड. उत्तम राठोड, बाबुराव पवार,अविनाश चव्हाण, नाईक विजय चव्हाण ( बंजारा संघर्ष योद्धा) उद्धव पवार, जिजाबाई राठोड, मीराबाई जाधव, संजय जाधव, रमेश चव्हाण, देविदास चव्हाण, विठ्ठल चव्हाण, मोहन राठोड, अंजेभाऊ राठोड, डी. बी. जाधव, गोरख पवार, एकनाथ चव्हाण, विठ्ठल राठोड, अर्जुन पवार, शिवाजी चव्हाण, सुरेश राठोड, शाम राठोड, गुलाब राठोड यांच्यासह परिसरातील बांधवांची उपस्थिती होती.

## महावितरणच्या तारांसह शेतकऱ्यांच्या मोटारी चोरणारी टोळी जेरबंद ; बदनापूर पोलिसांची मोठी कारवाई; ६ आरोपी अटकेत, १३ गुन्हे उघडकीस; २० लाख १४ हजारांचा मुद्देमाल जप्त

बदनापूर । प्रतिनिधी : महावितरणच्या विद्युत पोलवरील तांब्याच्या तारा तसेच शेतकऱ्यांच्या विहिरींवरील पाण्याच्या मोटारी, वायर आणि सोलार वायर चोरी करणाऱ्या टोळीचा बदनापूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत सहा आरोपींना अटक करण्यात आली असून तब्बल १३ गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून चोरीचा सुमारे ८ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल आणि दोन पिकअप वाहने असा एकूण २० लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मागील काही दिवसांपासून बदनापूर परिसरात महावितरणच्या विद्युत पोलवरील तारा तसेच शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मोटारी व वायर चोरीच्या घटना वाढल्या होत्या. काजळा, पानखेडा, ढोकसाळ, रोषणगाव, हलदोला, बदनापूर या परिसरात अशा घटना घडल्या होत्या. त्याचबरोबर कडेगाव शिवार, दाभाडी, डोंगरगाव व चनेगाव शिवारात



वायर व पाण्याच्या मोटारी चोरीला गेल्याने शेतकरी चिंतेत होते. या घटनांची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या सूचनेनुसार बदनापूर पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी तीन तपास पथके स्थापन केली. पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली पथकांनी मागील १५ दिवसांपासून तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू ठेवला. अखेर टोळीचा छडा लावत सहा आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये दिलीप गणेश शिंदे (रा. फुलेनगर, बदनापूर), विकास भाऊसाहेब मांदळे (रा. मातोश्री नगर, रेल्वे स्टेशन, बदनापूर), विजय बाबुराव पाखरे (रा. सातेगाव, ता. अंबड), संतोष तुकाराम पवार (रा. शेवगा, ता. अंबड) आणि अभिजीत (पान ३ वर)

## अजितदादा कायम महिलांच्या पाठीशी : रिंकल तायड

जालना : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार आणि महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा वैशालीताई नागवडे यांच्या सूचनेनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या वतीने जीवनराव पारे विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात संपन्न



मागील वर्षी स्वर्गीय अजितदादा पवार यांना प्रत्यक्ष भेटून राखी बांधण्याचा योग आला होता. शहरातील सुमारे ११०० भगिनींनी राख्या पाठवून अजितदादांप्रती आपले प्रेम आणि स्नेह व्यक्त केला होता यंदा मात्र अजितदादा आपल्यात नसल्याने त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवत आहे.

रिंकल तायड
शहर जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी
काँग्रेस महिला आघाडी, जालना

झाला. जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महिला आघाडीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जीवनराव पारे विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड यांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला राखी बांधून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले. यावेळी बोलताना रिंकल तायड म्हणाल्या, अजितदादा पवार हे कायम महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. महिलांचा सन्मान, स्वाभिमान, सुरक्षितता आणि सक्षमीकरणाला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. महिलांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून त्यांना न्याय देण्याची भूमिका त्यांनी सातत्याने घेतली. रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा सण आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या सन्मान व सुरक्षिततेबाबत समाजात जनजागृती करण्याचा प्रयत्न असल्याचेही रिंकल तायड यांनी सांगितले. अजितदादांनी महिलांसाठी घेतलेल्या विविध निर्णयांमुळे आणि त्यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळे महिलांमध्ये त्यांच्याबद्दल आत्मीयता व विश्वासाची भावना निर्माण झाली होती. रक्षाबंधनाच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेला राखी अर्पण करून त्यांच्या (पान ३ वर)

## निखिल सरकटे पुणे जि.प.चे प्राथमिक शिक्षक म्हणून निवड

तळणी (वा): मंठा तालुक्यातील तळणी येथील निखिल शिवाजीराव सरकटे यांची पुणे जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षक म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे तळणी परिसरासह मंठा तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. निखिल यांचे प्राथमिक शिक्षण जि.प. शाळा, बेलगाव येथे मामाकडे राहून झाले. त्यानंतर त्यांनी श्री शिवाजी हायस्कूल, केनवड येथून माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. आर. ए. कॉलेज, वाशिम येथून त्यांनी एम.एस्सी. (मॅथ्स) विशेष प्राविण्यासह पूर्ण केले असून, सत्यजित कॉलेज, मेहकर येथून बी.एड.ची पदवी घेतली आहे. उच्च



शिक्षणानंतर कोणत्याही मोठ्या शहरात न जाता घरीच राहून त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली. शिस्तबद्ध अभ्यास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या यशात वडील शिवाजीराव सरकटे,आई,मामा भाऊ व कुटुंबीयांचा मोठा वाटा आहे. या निवडीबद्दल निखिल सरकटे यांचे मित्र परिवार, नातेवाईक यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वाटूर येथे मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर

### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) परतूर तालुका व लोककल्याण आरोग्य केंद्र मुंबईचा संयुक्त उपक्रम; गरजू नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





वाटूर । प्रतिनिधी : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या परतूर तालुका शाखेच्या वतीने आणि लोककल्याण आरोग्य केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वाटूर येथे मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून अनेक गरजू नागरिकांनी मोफत आरोग्य सेवेचा लाभ घेतला. स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर सर्वसामान्य माणूस आणि गरजूंच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य तपासणीची सुविधा सहज उपलब्ध व्हावी, तसेच डोळ्यांच्या आजारांचे वेळीच निदान व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. शिबिरात आलेल्या नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर विशेष नेत्र तपासणी करून डोळ्यांशी संबंधित समस्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गावातील ज्येष्ठ नागरिकांसह महिला, पुरुष आणि गरजू नागरिकांनी शिबिरात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. मोफत तपासणीची सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे, उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, जिल्हा समन्वयक अशोकराव आघाव, अनंतराव वैद्य, तालुकाप्रमुख भारतराव पंडित, विभागप्रमुख संतोषराव फोके, महादेवराव शिंदे, राजुभाऊ शिंदे, रमेश बप्पा खवणे, रामराव वैद्य यांच्यासह (पान ३ वर)

# संपादकीय

## मुख्य जबाबदारी

कोणत्याही लष्करी मोहिमेच्या यशामध्ये प्रभावी रसद व्यवस्था अत्यंत महत्त्वाची असते आणि त्यामध्ये सैन्य सेवा दलाची भूमिका कणा म्हणून ओळखली जाते. सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड (सीडीएस) परीक्षेत यश मिळवणाऱ्या एका उमेदवारापासून ते भारतीय सैन्यात अधिकारी आणि त्यानंतर राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारीसारख्या प्रतिष्ठित पदापर्यंत पोहोचलेला त्यांचा प्रवास त्यांच्या समर्पण, कौशल्य आणि व्यावसायिक उत्कृष्टतेचे उदाहरण आहे. सेवेत तुलनेने कमी कालावधीत त्यांची या पदासाठी झालेली निवड ही त्यांच्या क्षमतेवर सैन्याने दाखवलेल्या विश्वासाची साक्ष आहे. राष्ट्रपतीची सहाय्यक अधिकारी हे पद भारतीय सशस्त्र दलांतील अत्यंत प्रतिष्ठेचे आणि मानाचे मानले जाते. सहाय्यक अधिकारी हे राष्ट्रपतींच्या वैयक्तिक कर्मचारीवर्गाचा भाग असतात आणि अधिकृत कार्यक्रम, राष्ट्रीय समारंभ, पदक वितरण सोहळे, राजनैतिक कार्यक्रम तसेच विविध शासकीय समारंभांमध्ये राष्ट्रपतींना सहाय्य करतात. या पदासाठी शिस्त, आत्मविश्वास, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उत्तम संवादकौशल्य आणि लष्करी प्रोटोकॉलचे सखोल ज्ञान आवश्यक असते. सहाय्यक अधिकारी हे केवळ आपल्या दलाचेच नव्हे, तर संपूर्ण भारतीय सशस्त्र दलाच्या सन्मानाचे आणि व्यावसायिकतेचे प्रतिनिधित्व करतात. दीर्घकाळ या पदांवर प्रामुख्याने पुरुष अधिकाऱ्यांची नियुक्ती होत होती. मात्र २०२५ मध्ये लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी यांच्या नियुक्तीनंतर महिलांसाठी नवे दालन खुले झाले. त्यानंतर मेजर नव्या शेखावत या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी म्हणून या प्रतिष्ठित भूमिकेत विराजमान झाल्या आणि महिलांच्या प्रगतीचा हा प्रवास आणखी मजबूत झाला. राष्ट्रपती भवनातील अधिकृत कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपतींसमवेत उभ्या असलेल्या मेजर शेखावत यांच्या छायाचित्रांनी आणि व्हिडीओंनी देशभरातील तरुणांमध्ये विशेष प्रेरणा निर्माण केली आहे. विशेषतः सैन्यात प्रवेश करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक तरुणींसाठी त्या 'नारी शक्ती'चे प्रेरणादायी प्रतीक ठरल्यात. भारतीय सैन्यात महिलांचा प्रवास पाहिला तर १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला महिलांना शॉर्ट सर्व्हिस कमिशनद्वारे प्रवेश देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर त्यांच्या जबाबदाऱ्या आणि संधी सातत्याने वाढत गेल्या. २020 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महिला अधिकाऱ्यांना परमनंट कमिशन देण्याचा ऐतिहासिक निर्णय दिल्यानंतर महिलांसाठी नेतृत्व, कमांड आणि दीर्घकालीन सेवाकार्यासाठी नवे मार्ग खुले झाले. मेजर नव्या शेखावत यांची नियुक्ती हा या व्यापक बदलाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यांचा प्रवास हेही सिद्ध करतो की केवळ लढाऊ शाखाच नव्हे, तर रसद आणि सहाय्यक शाखांतील अधिकारीही गुणवत्ता आणि उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचू शकतात. सैन्यातील यश हे केवळ शैक्षणिक गुणवत्तेवर अवलंबून नसून शारीरिक तंदुरुस्ती, नेतृत्व, आत्मविश्वास, शिस्त आणि चारित्र्य या सर्व गुणांच्या एकत्रित विकासावर आधारित असते. त्यांची नियुक्ती भारतीय सैन्याच्या मूलभूत मूल्यांची कर्तव्य, सन्मान आणि सेवा पुन्हा एकदा प्रचिती देते. गुणवत्ता आणि पात्रतेच्या आधारावर महिलांना उच्च जबाबदाऱ्या देऊन भारतीय सैन्याने नेतृत्व हे लिंगावर नव्हे तर गुणवत्तेवर अवलंबून असते, हा भक्कम संदेश दिला. राष्ट्रपती भवनात आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना त्या असंख्य भारतीय युवक-युवतींसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. त्यांचा प्रवास शिस्त, चिकाटी, व्यावसायिकता आणि निःस्वार्थ सेवाभाव यांचे उत्तम उदाहरण आहे. भारतीय सैन्याची वर्दी परिधान करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी मेजर नव्या शेखावत यांची कथा एक महत्त्वाचा संदेश देते – समर्पण, गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण मेहनत यांच्या बळावर इतिहास घडवता येतो. जो महिलेच्या यशाचा नाही, तर तिच्या जिद्दीचा, कर्तृत्वाचा आणि नेतृत्वगुणांचा गौरव करणारा आहे. भारतीय सशस्त्र दलात महिलांचे वाढते योगदान हे देशाच्या बदलत्या सामाजिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. महिलांनी केवळ सैन्यात प्रवेश मिळवला नाही, तर आपल्या गुणवत्ता, नेतृत्व, शिस्त आणि कर्तृत्वाच्या बळावर सर्वोच्च जबाबदाऱ्याही यशस्वीपणे पेलण्याची क्षमता सिद्ध केली. अशाच प्रेरणादायी प्रवासाची साक्ष देणारी मेजर नव्या शेखावत यांची भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी ) म्हणून झालेली नियुक्ती ही महिला सक्षमीकरणाच्या नव्या पर्वाचा अभिमानास्पद टप्पा ठरली आहे. जर नव्या शेखावत यांनी भारतीय लष्कराच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला. त्या भारताच्या राष्ट्रपतींच्या सहाय्यक अधिकारी (एडीसी) म्हणून नियुक्त झालेल्या भारतीय सैन्याच्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. राष्ट्रपती भवनातील ही प्रतिष्ठेची नियुक्ती भारतीय सशस्त्र दलासाठी एक ऐतिहासिक टप्पा असून, जबाबदारी, सन्मान आणि राष्ट्रीय प्रोटोकॉलच्या महत्त्वाच्या पदांवर महिलांची वाढती भूमिका अधोरेखित करणारे गौरवास्पद उदाहरण आहे. सैन्य सेवा दला(आर्मी सर्व्हिस कॉर्प)मधील अधिकारी असलेल्या मेजर नव्या शेखावत या सध्या भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. भारतीय सैन्यातील या पदावर नियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी असल्या तरी यापूर्वी मे २०२५ मध्ये भारतीय नौदलाच्या लेफ्टनंट कमांडर यशस्वी सोलंकी या राष्ट्रपतींच्या पहिल्या महिला अधिकारी बनल्या होत्या. मेजर शेखावत यांचे यश केवळ वैयक्तिक कामगिरी नसून भारतीय सशस्त्र दलांमध्ये महिलांच्या वाढत्या योगदानाचे आणि नेतृत्वक्षमतेचे प्रतीक आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे गुणवत्ता, व्यावसायिकता आणि नेतृत्व या गुणांच्या आधारे महिलांना सर्वोच्च जबाबदाऱ्या दिल्या जात असल्याचे स्पष्ट होते. मेजर शेखावत यांचा भारतीय सैन्यातील प्रवास संघ लोकसेवा आयोग (यूपीएससी) आयोजित संयुक्त संरक्षण सेवा (कम्बाइन्ड डिफेन्स सर्व्हिसेस-सीडीएस) परीक्षेद्वारे सुरू झाला. त्यांनी ही अत्यंत स्पर्धात्मक अशी परीक्षा उत्तीर्ण करून अधिकारी प्रशिक्षण अकादमी (ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी), चेन्नई येथील शॉर्ट सर्व्हिस कमिशन महिला अ-तांत्रिक (वुमन नॉन टेक्निकल) अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. अधिकारी प्रशिक्षण अकादमी चेन्नई ही भारतीय सैन्याची एक प्रतिष्ठित प्रशिक्षण संस्था आहे. येथे शारीरिक क्षमता, मानसिक खंबीरपणा, नेतृत्वगुण, शिस्त आणि अधिकारी म्हणून आवश्यक असलेले सर्व गुण विकसित केले जातात. मेजर शेखावत यांनी हे कठोर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून भारतीय सैन्यात अधिकारी म्हणून नियुक्ती मिळवली. त्यांना सेना सेवा दल (आर्मी सर्व्हिर्स कॉर्प)मध्ये नियुक्त करण्यात आले. भारतीय सैन्याच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची शाखा असून, लष्करासाठी आवश्यक असलेला रसद पुरवठा, वाहतूक व्यवस्था, इंधन, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक सामग्रीचे व्यवस्थापन ही तिची मुख्य जबाबदारी आहे.

# हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद राष्ट्रीय खेळांचे शिल्पकार





२९ ऑगस्ट १९05 मध्ये मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला व सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे तेजोमय लखलखता तारा या भारत भुमित जन्माला आला आणि दैवी शक्तीच्या रूपात हॉकीचा शहनशहा निर्माण झाला.मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून संपूर्ण भारतात साजरी केली जाते.हा दिवस संपूर्ण खेळाडूंसाठी सुवर्ण दिवस आहे. मेजर ध्यानचंद हे कर्तबगार,जिद्दी आणि चीकाटी वृत्तीचे महान खेळाडू होते. त्यांच्या खेळाकडे संपूर्ण जगाचे लक्ष रहात होते. कारण त्यांच्या खेळण्यात मोठी जादू होती.त्यामुळेच त्यांना हॉकीचे जादुगार म्हणतात.मेजर ध्यानचंद यांच्या कारकिर्दीत १९२८, १९३२, १९३६अशा प्रकारे तिनं वेळा गोल्डन कामगिरी बजावुन देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य केले.यातुन ते संपूर्ण जगात हॉकीचे जादुगार म्हणून प्रसिद्ध झाले.आज आपल्याला देशात राष्ट्रीय खेळांचा जो बोलबाला आणि लौकिकता दिसत आहे. त्याचे संपूर्ण क्षेय मेजर ध्यानचंद यांना जाते आणि यातूनच देशातील खेळाडूंना मानसन्मान मीळत आहे. हॉकी सोबतच कबड्डी, भालाफेक, थाळी फेक, खो-खोसह अशा अनेक मातीतील राष्ट्रीय खेळांना मोठे स्थान मिळविले आहे.यामुळे खेळाडूंचे होसले बुलंद झाल्याचे दिसून येते. देशात खासदार क्रीडा महोत्स किंवा इतर माध्यमातून खेळांना महत्व देऊन खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण केली जाते.याच अनुषंगाने अनेक खेळांचे मोठ्या प्रमाणात आयोजन वेगवेगळ्या राज्यांमध्ये केले जाते. राष्ट्रीय खेळांना सकारात्मक भूमिका देण्याचे क्षेय मेजर ध्यानचंद यांच्या प्रयत्नातूनच साकार होत आहे. आपण पहातो की आज देशातील महत्वपूर्ण संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचले आहे. त्यामुळे आपण पहातो की आज राष्ट्रीय खेळांचा बोलबाला आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. कबड्डी हा राष्ट्रीय खेळ होता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहोचला आहे ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.भारताने राष्ट्रीय खेळांमध्ये अव्वल स्थान मिळवून देशाची आन-बाण-शान उंचावण्याचे कार्य देशाच्या खेळाडूंनी केले. त्यामुळे आपण समजू शकतो की राष्ट्रीय खेळ अत्यंत शक्तीशाली आणि महत्वपूर्ण आहेत. भारतीय खेळाडू देशात-विदेशात जावुण राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावुन सुवर्ण पदक, रौप्य पदक व कांस्य पदक प्राप्त करून तिरंग्याची शान उंचावतात.त्यामुळे देशातील तळागाळातील संपूर्ण खेळाडूंना माझा सलाम. कॉमनवेल्थ गेम, ऑलिंपिक खेळ, पॅराऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय खेळ मोठ्या प्रमाणात दिसून येते व राष्ट्रीय खेळांमुळेच आपण आज जगात आपली आगळावेगळी छाप सोडली आहे व पकड मजबूत केली आहे.याचाच आनंद देशातील १४५ कोटी जनता नेहमी घेत असते.आज खेळांच्या बाबतीत असो वा अन्य बाबतीत संपूर्ण जग भारतासमोर नतमस्तक होतांना दिसते.याचे मुख्य कारण म्हणजे मेजर ध्यानचंद यांच्या सारख्या खेळाडूंनी घालून दिलेली जडणघडण व आपल्या पुर्वजांनी जे मातीतील खेळ आपल्याला शिकवीले त्यातूनच आज संपूर्ण राष्ट्रीय खेळ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणवु पोहोचल्याचे दिसून येते. त्याकाळी जगातील नामांकित व्यक्ती मेजर ध्यानचंद यांची हॉकी खेळण्याची कला पहाण्यासाठी उत्सुक असायचे.कारण लोकांना वाटायचं की त्यांच्या हॉकी स्टिकमध्ये चुंबक आहे की काय असे वाटत होते.१९३५ साली विश्वविख्यात क्रीकेटपटु डॉन ब्रॅडमन मेजर ध्यानचंद यांना भेटले.त्यांनी त्यांच्या हॉकीतील चेंडू वळवीचे सामर्थ्य पाहून कौतुक केले म्हणाले ध्यानचंदजी खरोखरच आपल्या खेळण्यात व खेळात जादू आहे.१९३६ साली बर्लिन येथे जर्मनीचा हुकुमशाह एडॉल्फ हिटलर हा हॉकीचा अंतिम सामना पहात होता.जर्मनी विरूद्ध भारत असा सामना होत असतांना भारताने जर्मनीचा ८ विरूद्ध १ गोलनी दनदणीत पराभव केला.हा खेळ पाहुण हिटलर आश्चर्य चकित मेजर ध्यानचंद यांना भेटीचे निमंत्रण दिले.या भेटीमध्ये हिटलरने मेजर ध्यानचंद यांचे खुप कौतुक केले व त्यांच्या खेळण्याची जादु पाहून जर्मनी सैन्यात मोठे पद देण्याची कबुल केले. परंतु मेजर ध्यानचंद यांचे राष्ट्रप्रेम सर्वो परी होते.त्यामुळे मेजर ध्यानचंद यांनी हिटलरची ऑफर नाकारली व त्यांनी हिटलरला सांगितले की माझ्यासाठी माझी मातृभुमि महान.१९२८ ते १९६४ हे युग भारतीय हॉकीसाठी सुवर्ण युग मानल्या जाते.कारण या काळात आठ ऑलिंपिकमध्ये सात सुवर्ण पदक मिळाले होते हा भारतासाठी गौरवशाली इतिहास आहे.काही दिवसांपूर्वी महिला कुस्तीपटूंवर मोठा अन्याय झाला होता व न्याय मिळावा यासाठी खेळाडूंना रस्त्यावर यावे लागले ही चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.त्यामुळे खेळाडुंच्या बाबतीत मी सरकारला विनंती करतो की देशातील कोणत्याही खेळाडूंवर अन्याय होत असेल तर त्याच्या विरोधात ताबडतोब कारवाई व्हायला हवी. कारण प्रत्येक खेळाडू देशाची आन-बान-शान आहे. त्याचा मान-सन्मान सर्वच स्तरातून व्हायला हवा यात कोणत्याही प्रकारचे राजकारण नकोच.तेव्हाच खेळाडूंची मान उंचावेल. देशातील संपूर्ण तळागाळातील खेळाडूंना विनंती करतो की देशातील वाढते बदलते हवामान, वाढते तापमान, वाढते प्रदूषण व दिवसेंदिवस कमी होत असलेली ऑक्सिजनची मात्रा पहाता आज वृक्ष लागवड करणे अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवसाचे औचित्य साधून संपूर्ण खेळाडूंनी,सरकारनी,शाळा-महाविद्यालय व स्थानिक प्रशासनाने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली पाहिजे असे मला वाटते.कारण आज लावलेले वृक्ष अनंत काळापर्यंत जिवित राहिल व २९ ऑगस्ट राष्ट्रीय खेळ दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# 'ऑपरेशन गलवान'चा आदेश देणाऱ्या जनरल झाओ जोंगकीला पदावरून हटवले





शांघाय: चिनी राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या सरकारनं एक मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेत, देशाचे प्रमुख राजकीय सल्लागार आणि माजी लष्करी कमांडर जनरल झाओ जोंगकी यांना त्यांच्या पदावरून हटवले आहे. डोकलाम संघर्ष आणि भारताविरोधात 'ऑपरेशन गलवान'चा आदेश दिल्यामुळे झाओ जोंगकी जगभरात चर्चेत आले होते. गलवान खोऱ्यातील संघर्षावेळी ते चिनी सैन्याच्या पश्चिम कमांडचे प्रमुख होते. भारताला धडा शिकवण्यासाठी त्यांनीच या गलवान ऑपरेशनला मंजुरी दिली होती, असा दावा अमेरिकेच्या गोपनीय अहवालात करण्यात आला होता. चायनीज पीपल्स पॉलिटिकल कन्सल्टेटिव्ह कॉन्फरन्सच्या सदस्यत्वावरून झाओ जोंगकी यांना हटवण्यात आले आहे. याशिवाय त्यांच्याकडे असलेल्या इतर दोन प्रमुख पदांचाही ताढकाफडकी ताबा काढण्यात आला आहे. शी जिनपिंग यांच्या भ्रष्टाचारविरोधी मोहिमेअंतर्गत आणि शिस्त व कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आल्याचे मानले जात आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून इतर दोन वरिष्ठ जनरल, झांग युक्सिया आणि लियू झेनली यांनाही केंद्रीय सैन्य आयोगातून बडतर्फ करण्यात आले आहे. अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांच्या अहवालानुसार, भारतावर दबाव वाढवण्यासाठी आणि अमेरिकेसह इतर देशांसमोर चीन कमकुवत दिसू नये, यासाठी जनरल झाओ यांनीच आक्रमक पवित्रा घेत गलवान ऑपरेशनला हिरवा झेंडा दाखवला होता. आता शी जिनपिंग यांनी घेतलेल्या या कठोर निर्णयानंतर चीनच्या राजकीय आणि लष्करी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. २017 मध्ये डोकलाम भागात भारत आणि चीनचे सैनिक आमनेसामने आले होते, तेव्हा दोन्ही देशांमध्ये तब्बल ७२ दिवस तणाव सुरू होता. या संपूर्ण संघर्षाच्या काळात झाओ हे वेस्टर्न थिएटर कमांडचे नेतृत्व करत होते. मे २020 मध्ये पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषावर तणाव वाढला, तेव्हाही झाओ याच विभागाचे प्रभारी होते. त्यानंतर १५ जून २020 रोजी गलवान खोऱ्यात भारत आणि चीनच्या जवानांमध्ये हिंसक संघर्ष झाला, ज्यात भारताचे २0 वीर जवान शहीद झाले होते. या घटनेनंतर भारत आणि चीन संबंधांमध्ये मोठा दुरावा निर्माण झाला होता, ज्या अंतर्गत भारताने अनेक चिनी प्सवर बंदी घालण्यासोबतच विमानसेवेवरही निर्बंध आणले होते.

# पंतप्रधान मोदी उझबेकिस्तानमध्ये पोहोचले

ताश्कंद : पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी शनिवारी संध्याकाळी उझबेकिस्तानमध्ये पोहोचले. ते राष्ट्राध्यक्ष शवकत मिर्झीयोयेव यांच्याशी अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा करणार आहेत. मोदींचा हा उझबेकिस्तानचा चौथा दौरा आहे. या दौऱ्यासाठी ताश्कंदच्या विमानतळावर येताच पंतप्रधान मोदींचे राष्ट्राध्यक्ष मिर्झीयोयेव यांनी स्वागत केले. मोदी दोन देशांचा दौरा करणार आहेत. ते दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात उझबेकिस्तानमध्ये पोहोचले आहेत. नंतर ते किर्गिझस्तानचा दोन दिवसांचा दौरा करणार आहेत. मध्य आशियाई देशांशी भारताचे मैत्रीपूर्ण संबंध आणखी दृढ करणे आणि विविक्ष क्षेत्रात सहकार्यासाठी करार करणे या हेतूनेच पंतप्रधान मोदी दौऱ्यावर आहेत. उझबेकिस्तानमध्ये व्यापार आणि गुंतवणूक हे त्यांच्या चर्चेतील दोन महत्त्वाचे विषय असतील. दोन्ही देश डिजिटल कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी नियोजन करणार आहेत. संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्राही भारत आणि उझबेकिस्तान सहकार्य करणार आहेत. दिल्लीतून निघताना परदेश दौऱ्याविषयी पंतप्रधान मोदींनी देशाला थोडक्यात माहिती दिली. अलिकडच्या वर्षांत भारत-उझबेकिस्तान सामरिक भागीदारीने लक्षणीय प्रगती केली आहे. उझबेक राष्ट्राध्यक्ष शवकत मिर्झीयोयेव यांच्यासोबत व्यापार आणि गुंतवणूक, डिजिटल कनेक्टिव्हिटी, संरक्षण आणि ऊर्जा या क्षेत्रांमध्ये सहकार्य अधिक दृढ करण्यावर, तसेच विकसित भारत आणि तरुण उझबेकिस्तानच्या सामायिक दृष्टिकोनाला पुढे नेण्यासाठी चर्चा करण्यावर भर देणार असल्याचे मोदी म्हणाले. शास्त्री स्मारक आणि ताश्कंद स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ ओरिएंटल स्टडीज येथील महात्मा गांधी केंद्रालाही भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले

# महत्त्वाचा मूलमंत्र आहे.

एका प्रौढ झाडाचा शहरासाठी विचार करा. ते कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी होते, जैवविविधता टिकते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर त्याचे सिद्ध परिणाम होतात. हे हजारो झाडांच्या शहरी जंगलात गुणाकार करा. आर्थिक मूल्य थक्क करणारे आहे आणि ते गमावल्यावरची किंमतही तितकीच मोठी आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरांमध्ये आर्बो रिकल्चरसाठी सर्वात मोठे आव्हान दिसते. कारण हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे – जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याच वेळी हे एक अखंड पायाभूत दबावाखाली असलेले शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. अनेक नव्हती. यातील फरक – झाड वाचवणे आणि झाड तोडणे – हा बऱ्याचदा एवढाच असतो की नियोजनाच्या टप्प्यात प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेत होता का? सुरक्षिततेचा आयाम तर आणखीच महत्त्वाचा आहे. मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामाच्या नुकसानीमुळे झाडे धोकादायक बनतात. संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेले झाड अप्रशिक्षित डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते आणि एक दिवस अचानक कोसळते. प्रमाणित आर्बोरिस्टकडून जोखीम मूल्यांकन हे ऐषोआरामाची गोष्ट नाही ती सार्वजनिक सुरक्षा आहे. जागरूकता आणि शिक्षण आवश्यक आहे पण पुरेसे नाही. भारतीय शहरांचा झाडांशी असलेला संबंध बदलण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप हवा, आणि तो तातडीने हवा. रोपटे लावणे म्हणजे प्रौढ झाड जतन करणे नव्हे. शंभर रोपटी एका ८0-वर्षांच्या वटवृक्षाची जागा घेत नाहीत. हा फरक धोरणात रुजवायला हवा. कॉर्पोरेट भारतालाही यात भूमिका आहे. खऱ्या अर्थाने सार्थक ईएसजी बांधिलकीमध्ये प्रकल्प स्थळांवर आर्बोरिकल्चरल कसोशीचा समावेश होतो. टिकाऊपणाबद्दल गंभीर असलेल्या कंपन्यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी व्यावसायिक वृक्ष-प्रभाव मूल्यांकन करवून घ्यायला हवे. काम झाल्यावर गच्चीवर रोपटे लावणे हे ग्रीनवॉशिंग आहे.

अनावश्यक तोडण्यात येणारी झाडे, चुकीच्या छाटणीने खालावणारे छत्र, अज्ञानी बांधकाम प्रथांमुळे मरणारे वारसा वृक्ष आणि अधिकाधिक गरम, गोंगाटमय आणि श्वास घेणे कठीण होत जाणारी शहरांची सध्याची परिस्थिती आहे. यावर कुठेतरी आळा बसणे गरजेचे आहे. अशी शहरे जिथे शतावर्षीय वटवृक्ष शाळेसाठी अडथळा नसतो, तर ती सर्वात मौल्यवान संपत्ती असते. शहरे वाढत राहणार आहेत. पण ती वाढ झाडांच्या विरोधात नसून त्यांच्या सहजीवनातून व्हायला हवी. 'वाढती शहरे, हिरवे छत्र' ही केवळ घोषणा नाही; ती भविष्यातील शहरांची रचना आहे. अशी शहरे जिथे पायाभूत सुविधा प्रकल्पांचा पहिला प्रश्न कोणती झाडे काढायची? असा नसून कोणती झाडे वाचवता येतील? असा असेल. मुंबई या बदलाचे नेतृत्व करू शकते आणि करायलाच हवे. असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो – परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच-त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो.


मी आर्बोरिस्ट आहे, असे सांगितले की अनेकदा समोरच्याचा प्रतिसाद फक्त विनम्रपणे मन डोलवण्यापुरता असतो आणि समज असतो की मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो किंवा विकेंडला कुंपण छाटतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे.

आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष-प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे यांशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो. हे प्रत्येक अर्थाने शहरी पायाभूत सुविधा व्यवस्थापनाचे एक शास्त्र आहे, जे भारताच्या मुख्य प्रवाहातील नियोजनातून जवळपास पूर्णपणे गायब आहे.

भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरू, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही. हे पायाभूत सुविधांचे म्हणणे आहे आणि भारतातील शहर नियोजनकार अभियंते, महानगरपालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी हे स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. योग्य व्यवस्थापन केल्यास ती स्वतःच 'विकास' आहेत का महत्त्वाचा मूलमंत्र आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# मुलांना तणावमुक्त ठेवा



महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे. परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढण्याला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमितपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते. अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ कसा होता किंवा त्यांनी काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे. महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे. मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी. अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वत: शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काय दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये. मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांचा ताण वाढल्यास मुलांनी त्याचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला घ्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे. परीक्षा सुरू असल्याने आपल्या मुलांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित करावे. विद्यार्थी आणि परीक्षा यांचा कसा सबंध असतो. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर आपले ध्येय सहज पार करू शकतो याची आठवण मुलांना करून द्यावी. काही वेळा परीक्षा काळात मुलांना चिंताग्रस्त होणे साहजिकच आहे. मात्र सकारात्मक दृष्टिकोन मुलांनी ठेवायला पाहिजे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया असून त्यावर सहज मात करता आली पाहिजे. यासाठी वर्षभरात झालेला अभ्यास दरदिवशी करणे आवश्यक आहे. अभ्यास झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता अधूनमधून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. म्हणजे त्या अभ्यासक्रमाची उजळणी होऊन मुलांच्या मनात तणाव निर्माण होत नाही. यात अभ्यासात चुकारपणा मुलांनी करू नये. अभ्यासासाठी मुलांवर दबाव वाढवू नये तर मुलांच्या समस्या सुद्धा पालकांनी समजून घेणे गरजेचे असते. परीक्षा झाल्यावर पेपरमध्ये कठीण प्रश्न कोणते होते? किती लिहिलाय? पेपर पूर्ण लिहिलाय काय? असे अनेक प्रश्न विचारत बसण्यापेक्षा आता पुढील परीक्षा कोणत्या विषयाची आहे. त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. परीक्षेला घरातून जाताना मुलांना आधार दिला पाहिजे. तसेच त्यांना धीर द्यावा म्हणजे मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त परीक्षा देऊ शकतात. तेव्हा मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त होण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

पान १ वरून

### महाराष्ट्रासह दिल्ली,

रुग्णसंख्या वाढण्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे राज्याच्या आरोग्य विभागाने मार्गदर्शक सूचना जारी करून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. महाराष्ट्रातही परिस्थिती चिंताजनक आहे. २१ ऑगस्टपर्यंत राज्यात एच१एन१चे १,१०९ रुग्ण आढळले आहेत. ही संख्या संपूर्ण २०२५ मध्ये नोंदलेल्या ९४२ रुग्णांपेक्षा अधिक आहे. राज्यातील एकूण बाधितांपैकी सुमारे ६५ टक्के रुग्ण मुंबई आणि पुणे शहरांत आढळले आहेत. पावसाळ्यात इन्फ्लूएंझाच्या रुग्णसंख्येत वाढ होणे सामान्य असले, तरी यंदाची रुग्णसंख्या मागील वर्षांच्या तुलनेत अधिक असल्याचे साथरोग तज्ज्ञांनी सांगितले. दरम्यान, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने (आयसीएमआर) देशात कोणत्याही नवीन स्ट्रेनची ओळख पटलेली नसल्याचे स्पष्ट केले आहे. सध्या आढळणारा इन्फ्लूएंझा ए (एच१एन१) वि०९ हा विषाणू २०२५ पासून सक्रिय आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून

### जात पडताळणी समित्यांच्या

जमातीच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी स्वतंत्र छाननी समित्यांची व्यवस्था करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. या निर्णयानुसार जात प्रमाणपत्रांची छाननी, पडताळणीची प्रक्रिया आणि समित्यांची रचना याबाबतची व्यवस्था करण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. जात आणि जमातीच्या प्रमाणपत्रांमध्ये होणारे गैरप्रकार रोखणे, खोटी प्रमाणपत्रे सादर करून आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांना आळा घालणे आणि आरक्षणाचा लाभ खऱ्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, हा अशा यंत्रणेचा प्रमुख उद्देश असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी स्पष्ट केले. त्यामुळे जातपडताळणी समित्यांची आवश्यकता नाही, असा दावा करणे म्हणजे या संपूर्ण कायदेशीर प्रक्रियेच्या उद्देशालाच हरताळ फासण्यासारखे असल्याचे त्यांनी म्हटले.

सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जात व जमातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा कार्यान्वित असल्याचा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर जातपडताळणीची प्रक्रिया राबविणे ही राज्य सरकारांची वैधानिक व कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे महाराष्ट्र या प्रक्रियेला अपवाद ठरू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. जातपडताळणी समित्यांचे अस्तित्व संपुष्टात आणण्याचा कोणताही प्रयत्न झाला, तर त्याला कायदेशीर आव्हान निर्माण होऊ शकते, असा इशाराही डॉ. लाखेपाटील यांनी दिला. राज्यातील केवळ मराठा समाजच नव्हे, तर विविध जाती-जमातींच्या नागरिकांच्या आरक्षणाच्या हक्काशी हा विषय संबंधित असल्याचे त्यांनी म्हटले. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यात आंदोलनाची पार्श्वभूमी असताना श्री विखेपाटील यांच्या अशा सल्ल्यामुळे मराठा समाजातील तरुणांमध्ये तसेच इतर जाती-जमातींच्या समाजघटकांमध्ये संभ्रम आणि असंतोष निर्माण होऊ शकतो. परिणामी सामाजिक तेढ वाढण्याची तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला. त्यामुळे या कथित वक्तव्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्यपालांनी गंभीर दखल घ्यावी. विखे पाटील यांना केवळ मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदावरूनच नव्हे, तर मंत्रिमंडळातूनही हटवावे, अशी आग्रही मागणी आपण केली असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले.




### महावितरणच्या तारांसह

विष्णू गरोटे (रा. नेहरू नगर, परभणी) यांचा समावेश आहे. तसेच या प्रकरणात अन्य आरोपींवरही कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी तपासादरम्यान चोरीच्या घटनांशी संबंधित १३ गुन्हे उघडकीस आणले आहेत. आरोपींकडून सुमारे ८ लाख १४ हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल तसेच १२ लाख रुपये किमतीची दोन पिकअप वाहने जप्त करण्यात आली. त्यामुळे एकूण जप्त मुद्देमालाची किंमत २० लाख १४ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. अटक आरोपींना न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत तारा, मोटार व केबल चोरीच्या घटनांचा छडा लागण्यास मदत झाली असून चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यातही पोलिसांना यश आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे व त्यांच्या पथकाने केली.

### बाळासाहेब ठाकरे यांच्या

शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वाटूर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पदाधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या आरोग्यविषयक अडचणी जाणून घेतल्या. ग्रामीण भागात अनेकदा आर्थिक परिस्थिती किंवा आरोग्य सुविधा दूर असल्याने नागरिक नियमित तपासणी करू शकत नाहीत. त्यामुळे अशा मोफत आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गरजूंपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचविणे आवश्यक असल्याचे उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षात समाजहित आणि लोकसेवेचा विचार केंद्रस्थानी ठेवून विविध उपक्रम राबविण्यात येणार असून सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी निगडित उपक्रमांनाही प्राधान्य दिले जाईल, असा विश्वास यावेळी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. शिबिर यशस्वी करण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या परतूर तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, लोककल्याण आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय पथकासह स्थानिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### अजितदादा कायम

अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड, मंदा ठोकळ, भारती पाडमुख, मुख्याध्यापक सुभाष पारे, माधव भद्रे, शरद गायकवाड, विजय खंडीभराड, बाबासाहेब शिंदे, प्रमोद बुणगे, अमरसिंग पावरा, विजय पारे, रेखा खरे, अमोल जाधव, मधुकर पालवे, सुहानी आदमाने, दुर्गा ढेमपे, समीक्षा रत्नपारखे, तमन्ना पठाण, अनुष्का आदमाने, दिक्षा आदमाने आदींची उपस्थिती होती.

पान ४ वरून...

### पुलाच्या उंचीवरून

करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

**सात गावांचा संपर्क विस्कळीत**

मुख्य रस्ता आणि डायव्हर्शन रस्ता बंद झाल्याने देवठाणा, उस्वद, खोरवड, हानवतखेडा, बन, बरडा आणि पिंपरी या गावांतील नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे. तळणी शहराशी दैनंदिन व्यवहारासाठी येणाऱ्या नागरिकांना पर्यायी मार्गांचा आधार घ्यावा लागत आहे.

रुग्णांची सर्वाधिक परवड वैद्यकीय उपचारासाठी तळणीकडे येणाऱ्या रुग्णांना रस्ता बंद असल्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिकांचीही मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. गॅस पुरवठ्यावर परिणाम परिसरातील गॅस सिलिंडर वितरण व्यवस्था पुलाच्या पलीकडे असल्याने रस्ता बंदचा थेट परिणाम गॅस ग्राहकांवर झाला आहे. अनेक गावांमध्ये सिलिंडर पोहोचण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. विद्यार्थ्यांचेही हाल तळणी येथे शाळा व महाविद्यालयासाठी ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही वाहतूक बंदचा फटका बसला आहे. त्यामुळे आंदोलनाचा प्रश्न आता केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित न राहता परिसरातील जनजीवनाशी जोडला गेला आहे. आंदोलन योग्य; मात्र रस्ता खोदण्याला नागरिकांचा विरोध शेतकऱ्यांचा प्रश्न रास्त असला, तरी आंदोलनासाठी मुख्य रस्ता आणि पर्यायी मार्ग खोदून सर्वसामान्यांची वाहतूक रोखणे योग्य आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.शेतकऱ्यांनी आपल्या हक्कासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करावे; प्रशासनाविरोधात आवाज उठवावा. मात्र, रुग्ण, विद्यार्थी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरू नये,' अशी भूमिका काही स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. प्रशासन आता तरी जागे होणार का? एका बाजूला शेतकऱ्यांचा शेतरस्त्यांचा गंभीर प्रश्न, तर दुसऱ्या बाजूला दोन दिवसांपासून ठप्प झालेली वाहतूक आणि त्यामुळे हैराण झालेले नागरिक, अशी कोंडी निर्माण झाली आहे. आंदोलन चिघळण्यापूर्वी प्रशासनाने घटनास्थळी पाहणी करून शेतकरी, संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांची संयुक्त बैठक घेऊन तोडगा काढणे गरजेचे आहे. पुलाची उंची, शेतरस्ते, कामाचा दर्जा आणि वाहतुकीसाठी पर्यायी व्यवस्था या सर्व प्रश्नांवर प्रशासन काय निर्णय घेते, तसेच संबंधित यंत्रणा आणि कंत्राटदाराची जबाबदारी निश्चित होते का, याकडे आता तळणी परिसराचे लक्ष लागले आहे.

## दोन दिवसांच्या दौऱ्यात भारत - उझबेकिस्तानमध्ये होणार अनेक महत्त्वाचे करार



दिल्लीतून निघताना परदेश दौऱ्याविषयी पंतप्रधान मोदींनी देशाला थोडक्यात माहिती दिली. अलिकडच्या वर्षांत भारत-उझबेकिस्तान सामरिक भागीदारीने लक्षणीय प्रगती केली आहे. उझबेक राष्ट्राध्यक्ष शवकत मिर्झीयोयेव यांच्यासोबत व्यापार आणि गुंतवणूक, डिजिटल कनेक्टिव्हिटी, संरक्षण आणि ऊर्जा या क्षेत्रांमध्ये सहकार्य अधिक दृढ करण्यावर, तसेच विकसित भारत आणि तरुण उझबेकिस्तानच्या सामायिक दृष्टिकोनाला पुढे नेण्यासाठी चर्चा करण्यावर भर देणार असल्याचे मोदी म्हणाले. शास्त्री स्मारक आणि ताश्कंद स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ ओरिएंटल स्टडीज येथील महात्मा गांधी केंद्रालाही भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले. मोदी उझबेकिस्तान नंतर किर्गिझस्तानचा दौरा करणार आहेत. किर्गिझ प्रजासत्ताकचे अध्यक्ष सादिर झापारोव्ह यांच्या निमंत्रणावरून बिश्केक येथे होणाऱ्या २६ व्या शांघाय सहकार्य संघटना (डउज) शिखर परिषदेत मोदी सहभागी होणार आहेत. सुरक्षा, संपर्क आणि संधी यांवर आधारित प्रदेशासाठी तसेच दहशतवाद, फुटीरतावाद व अतिरेकीपणापासून मुक्त प्रदेशासाठी डउज च्या इतर सदस्य राष्ट्रांसोबत काम करण्यास उत्सुक असल्याचे मोदी म्हणाले. त्यांनी सांगितले की, ही आव्हाने शेजारील देशांसाठी आणि शांतता व स्थिरतेसाठी सतत धोका निर्माण करत आहेत. पंतप्रधानांनी सांगितले की, किर्गिझ प्रजासत्ताकच्या दौऱ्यादरम्यान ते अध्यक्ष सादिर झापारोव्ह आणि डउज च्या इतर नेत्यांना भेटतील, तसेच ६ व्या जागतिक नोमॅडिक खेळांच्या उद्घाटन समारंभालाही उपस्थित राहतील.

# आष्टीत जमीयतच्या भव्य रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; १५२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

सय्यद जुनेद परतूर प्रतिनिधी : मिलादुन्नबी व स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आष्टी येथे जमीअत उलेमा–ए–हिंद, आष्टी व सर्कल तसेच आष्टी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल १५२ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. शिबिराच्या सुरुवातीपासूनच रक्तदान करण्यासाठी युवकांसह विविध वर्गातील नागरिकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून गरजू रुग्णांच्या मदतीसाठी आपले योगदान दिले. रक्त संकलनासाठी बीएसपी ब्लड बँक, औरंगाबाद तसेच आधार ब्लड बँक, जालना यांच्या वैद्यकीय पथकांनी विशेष उपस्थिती लावून रक्त संकलनाचे कार्य केले. या शिबिराचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महिलांनीही उत्स्फूर्तपणे रक्तदानात सहभाग घेतला. महिलांच्या या सहभागामुळे उपस्थितांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. मानवतेच्या सेवेत महिलाही आघाडीवर असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. जमीयतचे अध्यक्ष मुफ्ती अलीम यांनी सांगितले की, रक्तदान हे अत्यंत महान कार्य असून




एका व्यक्तीने केलेले रक्तदान गरजू रुग्णासाठी जीवनदायी ठरू शकते. नागरिकांमध्ये रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करणे आणि अधिकाधिक नागरिकांना या सेवाकार्यात सहभागी करून घेणे हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या रक्तदान शिबिरास आष्टीचे सपोनी गणेश सुरवसे, सरपंच मधुकर मोरे, उपसरपंच नसरुल्लाह काकड, सेकंड एपीआय शेडके



साहेब, रामप्रसाद थोरात सर, चौकाजी नाना, जमीर भाई, गणेश वैदे, हाफिज महमूद जमींदार, ग्रामपंचायत सदस्य आसिफ भाई जमींदार, अनिल मोर, आसिफ भाई कच्ची, दीपक भालशंकर, डॉ. रईस साहेब यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. जमीयतच्या वतीने हाफिज इरफान कुरेशी, हाफिज आरिफ, मौलाना अलीम बागवान, मौलाना आदिल, हाफिज मोबिन कुरेशी, सादिक भाई कुरेशी, ड. वसीम जमींदार, लुकमान कुरेशी, हबीब भाई टाकलीकर, फय्याज भाई कुरेशी, इनायत खान काकड, अलीम चाऊस यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणारे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, पोलीस प्रशासन, वैद्यकीय पथक तसेच रक्तदात्यांचे जमीयतचे सचिव तथा पत्रकार मुजीब जमींदार यांनी आभार मानले. तसेच भविष्यातही नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून मानवतेच्या सेवेत योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

# अंबडकरांचा 'जोगवा' तुळजाभवानीच्या चरणी!

## महाअन्नदानासाठी २१ टन गव्हाचा संकल्प; ३५ मंदिरांमध्ये बैठकांमधून नियोजन

अंबड (प्रतिनिधी–निलेश मनियार): त्रिविध तापाची करावया झाडणी, भक्ता लागणी तु पावशी निर्वाणी... या भक्तिभावनेतून अंबड शहरात श्री तुळजाभवानी जोगवा यात्रेच्या निमित्ताने एका मोठ्या धार्मिक व सामाजिक उपक्रमाचा संकल्प करण्यात आला आहे. आई तुळजाभवानीच्या दरबारात होणाऱ्या गुरुचरित्र पारायण सोहळ्यातील महाअन्नदानासाठी अंबड शहरातून तब्बल २१ टन गहू जोगव्याच्या स्वरूपात पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ३५ मंदिरांमध्ये बैठकांद्वारे नियोजन या उपक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी अंबड शहरातील सुमारे ३५ मंदिरांमध्ये गेल्या तीन आठवड्यांपासून विविध बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. गहू संकलन, जोगवा मागणी, वाहतूक व्यवस्था आणि महाअन्नदानासाठी नागरिकांचा सहभाग याबाबत सविस्तर नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाला अंबडकर नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अहंकाराचा त्याग आणि सेवाभाव जोगवा किंवा भिक्षा मागणे हे केवळ धान्य संकलन नसून तो अहंता, मोह, काम, क्रोध, मद आणि मत्सर या षड्रिपूंमधील 'अहंकार' सोडून सेवाभाव अंगीकारण्याचा मार्ग मानला जातो. या भावनेतूनच भाविक दैनंदिन सांसारिक कामे बाजूला ठेवून या सेवाकार्यात सहभागी होत आहेत. २७ ते ३० ऑगस्टदरम्यान गहू संकलन गहू




संकलनाची मुदत २७ ऑगस्ट ते ३० ऑगस्टदरम्यान ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील मंदिरात जाऊन गहू जमा करावा किंवा स्वयंसेवकांकडे सुपूर्द करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जमा होणारा प्रत्येक किलो गहू तुळजापूर येथील महाअन्नदानात सढळ हाताने हातभार लावणार आहे. विशेष आवाहन: शहरातील प्रत्येक कुटुंबाने आपल्या ऐपतीनुसार अधिकाधिक गहू अर्पण करून तुळजाभवानीच्या दरबारातील या महाअन्नदानात आणि सेवाकार्यात सक्रिय सहभागी व्हावे.

# संजय गांधी निराधार योजनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष पद्माकर कवडे यांचा सत्कार

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने संजय गांधी निराधार कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झालेले नवनिर्वाचित अध्यक्ष पद्माकररावजी कवडे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस मा.श्री.विठ्ठलराव बरकुले पाटील, रमेश पाईकराव सामाजिक न्याय विभाग प्रदेश सहसचिव, अहमद शेख ,कलीम भाई उपस्थित होते.

तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस मा. श्री. विठ्ठलराव पाटील यांनी अभिनंदन करते वेळेस सर्वप्रथम लोकनेते आमदार बबनरावजी लोणीकर साहेब व मा.श्री.राहुल



भैया लोणीकर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष यांचे अभिनंदन केले कारण त्यांनी घेतलेला हा निर्णय परतूर तालुक्या पुरताच मर्यादित न राहता पूर्ण महाराष्ट्राच्या हिताचा राहील व सर्वसामान्यांच्या न्यायाला वाचा फोडण्यात येईल या दृष्टिकोनातून घेतलेला निर्णय म्हणजेच सामान्य कार्यकर्त्याला आपल्या पदाचा हिस्सा देऊन एक आदर्श निर्माण केलेला आहे म्हणून माझ्या मते मी नामदार लोणीकर साहेबांना लोकनेते म्हणून संबोधन संबोधित करत आहे.

# चंदनझिरा पोलिस ठाण्याच्या भव्य इमारतीचे आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा संपन्न

जालना : शहरातील चंदनझिरा एमआयडीसी परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने उभारण्यात येणाऱ्या चंदनझिरा चखऊउ पोलिस ठाण्याच्या भव्य नवीन इमारतीच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा भूमिपूजन सोहळा शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या नवीन इमारतीमुळे चंदनझिरा एमआयडीसी परिसरासह लगतच्या भागातील नागरिकांना पोलिस सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार असून, परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाला अधिक सक्षम पायाभूत सुविधा मिळणार आहेत. आधुनिक व सुसज्ज पोलिस ठाण्याच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, गुन्हे प्रतिबंधक कारवाई तसेच विविध प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होणार आहे. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत विधिवत पूजा करून नवीन इमारतीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

चंदनझिरा एमआयडीसी परिसराचा वाढता विस्तार तसेच औद्योगिक आणि नागरी भागातील वाढती वर्दळ लक्षात घेता, स्वतंत्र व सुसज्ज पोलिस ठाण्याची इमारत उभारणे ही महत्त्वाची गरज होती. नवीन इमारतीच्या माध्यमातून पोलिस प्रशासनाचे कामकाज अधिक गतिमान होऊन नागरिकांना सुरक्षिततेची अधिक सक्षम व्यवस्था उपलब्ध होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या भूमिपूजन सोहळ्यामुळे चंदनझिरा एमआयडीसी परिसराच्या विकासात आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले असून, भविष्यात ही नवीन पोलिस ठाण्याची इमारत परिसरातील नागरिकांसाठी आधुनिक आणि सक्षम पोलिस सेवांचे केंद्र ठरणार आहे. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी चंदनझिरा चखऊउ पोलिस ठाण्याच्या नवीन इमारतीसाठी सहकार्य केल्याबद्दल ✻✻मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार✻✻ यांचे जालना विधानसभा मतदारसंघाच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले. तसेच जालना शहरातील वाढत्या गुंड टोळ्या आणि तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या नशेच्या प्रमाणावर प्रभावीपणे आळा घालण्यासाठी जालना पोलिस प्रशासनाने अधिक सक्षमपणे मोर्चेबांधणी करून कठोर कारवाई करावी✻✻, अशी मागणीही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी केली. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी पोलिस प्रशासनाने गुन्हेगारी आणि अमली



पदार्थांच्या व्यवहारांविरोधात ठोस पावले उचलावीत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थितांना संबोधित करताना पोलिस दलाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, ✻✻पोलिस दलाच्या माध्यमातून समाजात कायद्याचा वचक निर्माण केला जातो. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस बांधव दिवस–रात्र आपले कर्तव्य बजावत असतात. मुंबईतील ताज हॉटेलवरील दहशतवादी हल्ल्याच्या वेळी नागरिकांच्या संरक्षणासाठी अनेक पोलिस बांधवांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या शौर्याचा आणि बलिदानाचा आम्हाला सदैव अभिमान राहील, असेही त्यांनी सांगितले. तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या नशेच्या प्रमाणावर आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने अधिक कठोर भूमिका घ्यावी. तसेच शहरात गुंडगिरी करणाऱ्या प्रवृत्तींना खाकीचा वचक दाखवून कायद्याचे राज्य अधिक मजबूत करावे, असे आवाहनही आमदार खोतकर यांनी यावेळी केले. जालना शहराच्या वाढत्या विस्ताराचा विचार करता पोलिस यंत्रणा अधिक सक्षम करणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी ✻✻सदर बाजार पोलिस स्टेशन, तालुका पोलिस स्टेशन आणि कदीम जालना पोलिस स्टेशन✻✻ या सर्व पोलिस ठाण्यांच्या नवीन इमारतींसाठी जागेसह प्रस्ताव मंजूर करून घेण्याची जबाबदारी आपण घेत असल्याचे आश्वासन दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, असेही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी स्पष्ट केले. या वेळी आमदार नारायण कुचे, श्री तेघवीर सिंह संधू (भा.पो.से.), शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख भास्कर आंबेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, श्री विक्रम साळी (भा.पो.से.), श्री अनंत कुलकर्णी (भा.पो.से.), पोलिस निरीक्षक किरण बिडवे, घनश्याम गोयल, संतोष मोहिते, बाळासाहेब पवार, कमलेश खरे, नगरसेविका दर्शना झोल, नगरसेवक अमोल ठाकूर, नगरसेविका संध्या देठे, नगरसेविका रिमा खरात, अजित छाबडा, पांडुरंग डोंगरे, अर्जुन गेही, गणेश सुपारकर, रितेश पंचारिया, संतोष रासवे, अंबादास चितेकर, आनंद धोत्रे, दिनेश दैने, सुनील बोर्डे, बाला परदेसी, मुन्नू खान, राम सतकर, अरुण अग्रवाल, धीरेन मेहरा, सतीश गोयल, गोपाल मानधना, डी. बी. सोनी, नंदू जांगडे, दीपक भुरेवाल, महेंद्र भक्कड, दत्ता काकडे, सुनील आदमाने, राधाकिसन दाभाडे, शांतीलाल राऊत✻✻ यांच्यासह सर्व पोलिस अधिकारी, कर्मचारी, परिसरातील व्यापारी बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सत्तेत असलेल्यांना प्रश्न विचारणारी निर्भीड पिढी घडतेय; देशभर परिवर्तनाचे आशादायी चित्र : राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक डोके

जालना : (प्रतिनिधी) परतुर तालुक्यातील वाटूर येथे दिनांक २८ ऑगस्ट २०२६ रोजी पौर्णिमेचे औचित्य साधून भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचा समारोपीय कार्यक्रम वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक डोके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न झाला यावेळी बाळासाहेब आचळे भारतीय बौद्ध महासभा ठाणे जिल्हा संस्कार सचिव,बाळासाहेब अंभोरे माजी सभापती, पंचायत समिती परतुर, पळसखेड सरपंच राजु प्रधान, दिलीप मगर आदी सह मान्यवर प्रमुख उपस्थितीत होते यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना श्री डोके यांनी सांगितले की,



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा आणि ॲड. बाळासाहेब आंबेडकरांचे लढण्याचे बळ यामुळे प्रश्न विचारणारी, संविधानिक मूल्यांसाठी संघर्ष करणारी आणि अन्यायाविरोधात आवाज उठवणारी तरुणाई तयार होत आहे. हीच जागरूक पिढी भविष्यात लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास श्री .डोके यांनी व्यक्त केला.

सत्तेत असलेल्यांना प्रश्न विचारण्यासाठी मागे–पुढे न पाहणारी पिढी घडत आहे. ही प्रक्रिया देशातील परिवर्तनाचे आशादायी चित्र निर्माण करणारी आहे, असे दिपक डोके यांनी सांगितले. भारतीय बौद्ध महासभेचे ठाणे जिल्हा संस्कार सचिव बाळासाहेब आचळे यांनी नियमित भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन केले कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी प्रतापराव मोरे , उत्तमराव मोरे ,बाबुराव आचळे, किसन खाडे ,अमोल मोरे, भीमराव मोरे ,भगवानराव मोरे, कुंडलिकराव उघडे, भगवान खरात, विलास मोरे, राजू शेजुळ, लहू मोरे, राहुल मोरे, मुकेश मोरे, नितीन शिंदे, उमेश उघडे, सिध्दार्थ मगर, भास्कर आचळे यांनी परीश्रम घेतले.

# पुलाच्या उंचीवरून शेतकरी आक्रमक; हत्ता–तळणी महामार्ग दोन दिवसांपासून ठप्प!

तळणी (वा.) : हत्ता–तळणी महामार्गावरील देवठाणा रस्त्यावरील निर्माणाधीन पुलाच्या उंचीवरून शेतकरी आणि प्रशासनातील वाद आता चिघळला आहे. पुलाची उंची वाढवल्यामुळे शेताकडे जाणारे पारंपरिक रस्ते बंद होत असल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी शुक्रवारी (ता. २८) सकाळी ११ वाजता पुलावरच बेमुदत उपोषण सुरू केले. आंदोलनाची तीव्रता वाढवत आंदोलकांनी मुख्य रस्त्यासह तात्पुरता डायव्हर्शन रस्ताही खोदल्याने गेल्या दोन दिवसांपासून हत्ता–तळणी मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहिले नाही, तर आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता असून, दुसरीकडे रस्ता बंद झाल्याने सर्वसामान्य नागरिकही त्रस्त झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा रास्ता प्रश्न आणि नागरिकांची होणारी गैरसोय यामध्ये प्रशासनाची भूमिका निर्णायक ठरणार आहे. 'पुलाची एवढी उंची कशासाठी?' शेतकऱ्यांचा सवाल निर्माणाधीन पुलाची उंची अवाजवी वाढविण्यात आल्याचा शेतकऱ्यांचा आक्षेप आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना शेतरस्त्यांची व्यवस्था न करता काम पुढे नेण्यात आल्याने शेतीकडे जाण्या–येण्याचा प्रश्न गंभीर झाल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. 'आधी शेतकऱ्यांच्या रस्त्यांची सोय करा, त्यानंतरच पुलाचे काम करा,' अशी भूमिका घेत शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे. या कामासाठी स्थानिक शेतकऱ्यांची भूमिका आणि त्यांच्या शेतरस्त्यांचा विचार आराखडा तयार करताना करण्यात आला का, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. पुलाची गरज आणि त्याची उंची याबाबत शेतकऱ्यांनी गंभीर आरोप केले असून, शासकीय निधीचा गैरवापर होत असल्याची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

दोन निवेदने, तरीही तोडगा नाही या प्रश्नाबाबत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दोन वेळा निवेदने दिल्याचे सांगण्यात येते. मात्र, अद्याप ठोस तोडगा निघाला नसल्याने शेतकऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. निवासी जिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी मागण्या सोडविण्याऐवजी वेगळा सल्ला दिल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. या प्रकरणात प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात, अशी मागणी होत आहे. २०० कोटींच्या कामाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह हत्ता–तळणी महामार्गाचे काम सुमारे २०० कोटी रुपयांच्या निधीतून सुरू असल्याचे सांगण्यात येते. हे काम 'साकार इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' या कंपनीकडे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. कोट्यवधींचा निधी खर्च होत असताना कामाचा दर्जा, पुलाची उंची, आराखडा आणि शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांचा विचार या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी **(पान ३ वर)**